मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# 'पीएमआरडीए'च्या अर्थसंकल्पाला मंजुरी

## प्रधानमंत्री आवास योजना : महापालिका 755 सदनिकांचे हस्तांतरण करणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रस्तावित नवीन पुरंदर विमानतळ परिसरात रस्त्यांचे जाळे विकसित करण्यासाठी ६३६ कोटी, रांजणगाव ते हिंजवडी औद्योगिक क्षेत्रातील सिमेंट रस्त्यांसाठी २०३ कोटी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रारूप विकास आराखड्यात प्रस्तावित करण्यात आलेल्या 'अर्बन ग्रोथ सेंटर'साठी रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यासाठी १ हजार ५२६ कोटी, येरवडा ते कात्रज ट्वीन टनेल भुयारी मार्ग, पीएमपीसाठी पाचशे गाड्यांची खरेदीसाठी अडीचशे कोटी अशा विविध प्रकल्पांचा समावेश असलेल्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) अर्थसंकल्पास बुधवारी मान्यता देण्यात आली.

मुख्यमंत्री, 'पीएमआरडीए'चे अध्यक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झालेल्या बैठकीत आगामी आर्थिक वर्षासाठीचा (२०२५-२६) ४ हजार ५०३ कोटींचा अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली. या अर्थसंकल्पात शहर आणि ग्रामीण भागातील दळणवळण गतिमान करण्यासाठी भर देण्यात आला आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे उपस्थित होते.




नियोजित वर्तुळाकार मार्ग (रिंग रोड), पुणे-सातारा आणि पुणे-नगर रस्त्यापासून प्रस्तावित पुरंदर विमानतळाला 'कनेक्टिव्हिटी' तयार करण्यात येणार असून, त्यासाठीही भरीव तरतूदही अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. 'पीएमआरडीए'ची विकास योजना (डीपी) तयार करण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे दोन टप्प्यात आराखडा करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी केली. पहिल्या टप्प्यात योजनेतील रस्ते, मलनिःस्सारण, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, स्मशानभूमी, दफनभूमी आदींचा समावेश असून, उर्वरित दुसऱ्या टप्प्यात अन्य सुविधांचा समावेश करण्यात येणार आहे. भविष्यातील लोकसंख्येचा विचार करता पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करत प्रकल्प कार्यान्वित करण्याचेही या बैठकीत निश्चित करण्यात आले.

पुरंदर येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रस्तावित आहे. त्यामुळे विमानतळ परिसरात रस्त्यांचे जाळेही 'पीएमआरडीए'कडून विकसीत केले जाणार आहे. त्यासाठी ६३६ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच, रांजणगाव आणि हिंजवडी येथील औद्योगिक क्षेत्रात सिमेंटचे रस्ते करण्यात येणार आहेत. त्यासाठी २०३ कोटी देण्यात येणार आहेत. अर्बन ग्रोथ सेंटरसाठी रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यात येणार असून त्यासाठी तब्बल १ हजार ५२६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### मेट्रोच्या उड्डाणपुलासाठी जागा देण्याची सूचना

» राजभवन आवारातील जागा मेट्रोच्या उड्डाणपुलासाठी देण्याची कारवाई तातडीने पूर्ण करावी, अशी सूचनाही देवेंद्र फडणवीस यांनी केली. नवीन शहर करताना रस्ते १८ मीटर रुंदीचे करावे. भविष्यातील लोकसंख्येचा विचार करीत पायाभूत सुविधांचा अंतर्भाव करावा. प्राधिकरणाने पिण्याच्या पाण्यासाठी पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करावी. प्राधिकरणांनी अद्ययावत संकेतस्थळ सुरू करावे. संकेतस्थळावरून जास्तीत जास्त ऑनलाइन सुविधा देण्यात याव्यात. विकास शुल्क नागरिकांना परवडेल अशा पद्धतीने ठेवावे, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# खासदार श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रोजगार मेळावा

## शनिवारी युवासेनेच्या वतीने थेरगाव येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त युवासेनेच्या वतीने थेरगाव येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि.१५ फेब्रुवारी २०२५ रोजी, सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मोरया बँक्वेट हॉल, दत्तनगर, थेरगाव येथे हा मेळावा आयोजित होणार असल्याची माहिती पश्चिम महाराष्ट्राचे युवासेना सचिव विश्वजीत बारणे यांनी दिली आहे.




विश्वजीत बारणे यांनी म्हटले आहे की, देशाचे उज्ज्वल भविष्य हे आजच्या तरुणांच्या हातात आहे. त्यांना देशाच्या प्रगतीत योगदान देण्यासाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून देणं अत्यंत महत्त्वाचं आहे. याच दृष्टिकोनातून व मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत युवासेनेच्या वतीने हा भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात येत आहे.

या रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील ५० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नामांकित कंपन्यांचा सहभाग असणार आहे. यावेळी ५ हजाराहून अधिक तरुण-तरुणींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. या मेळाव्यात पाचवी ते पदवीधर पर्यंतचे शिक्षण असणाऱ्यांना तरुणांना सहभागी होता येणार आहे. त्याचप्रमाणे यावेळी निवड झालेल्या उमेदवारांना तात्काळ नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे.

# पुण्यात उत्सवांमध्ये आवाजाची मर्यादा शिथिल!

## उत्सव मंडळांना गुड न्यूज : गणेशोत्सवासाठी 6 दिवस, नवरात्रात मिळणार 2 दिवस

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यासाठी वर्षभरातील उत्सवांसाठी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकाच्या वापरासाठी जिल्हा प्रशासनाने १५ दिवस निश्चित केले आहेत. त्यात गणेशोत्सवासाठी ६ दिवस तर नवरात्रासाठी २ दिवस ध्वनीमर्यादा सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत शिथिल करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत.



केंद्र सरकारच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियमानुसार जिल्ह्यात १५ दिवसांसाठी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकाच्या वापरासाठी सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत वापर करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्यात शिवजयंती बुधवार१९फेब्रुवारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सोमवार १४ एप्रिल, महाराष्ट्र दिन गुरवार १ मे, गणपती उत्सव, ईद ए मिलाद व अनंत चतुर्दशीपर्यंत सोमवार १ ते शनिवार ६ सप्टेंबरपर्यंत ६ दिवस, नवरात्री उत्सव १ व २ऑक्टोबरपर्यंत २ दिवस, नाताळ गुरुवार २५ डिसेंबर व वर्षाअखेर बुधवार ३१ डिसेंबर असे १३ दिवस असतील. तसेच महत्वाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार २ दिवस परवानगी दिली जाईल असेही डूडी यांनी काढलेल्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

उत्सवाच्या दिवशी या वेळेत ध्वनीची विहित मर्यादा राखून ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेचा वापर करावा. झोनींग प्रमाणे ठरलेल्या मयादेपेक्षा जास्त आवाज ठेवू नये. ही सूट शांतता क्षेत्रात लागु नसल्याने त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित सर्व यंत्रणांची राहील असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

### ध्वनी प्रदूषण कमी करणे शक्य...

» महाराष्ट्रात जन्म असो वा लग्न, धार्मिक कार्यक्रम असो वा सामाजिक समारंभ, सण असो वा उत्सव, प्रत्येक ठिकाणी ध्वनिक्षेपक दिसतात, बऱ्याच वेळा ध्वनिक्षेपकाचा आवाज मर्यादेपेक्षा कितीतरी अधिक चढलेला असतो. महाराष्ट्रात गणेशोत्सवात ध्वनिक्षेपकांच्या आवाजाचा स्तर सर्वाधिक असतो. धार्मिक कार्यक्रमांबाबत लोकांच्या भावनांचा आदर करून यंत्रणेतील अधिकारी कारवाई टाळतात. कारवाई केल्यास असंतोष पसरण्याची भीती असते. परंतु वाहनांमधील कर्कश म्युझिक सिस्टीम आणि अन्य कार्यक्रमांवेळी लावल्या जाणाऱ्या ध्वनिक्षेपकांवर कारवाई करून तेवढे तरी प्रदूषण कमी करता येणे शक्य आहे.

# वायुवेग पथकांकडून वाहनचालकांना दणका

## बेशिस्त वाहनचालकांवर आरटीओच्या वायुवेग पथकाने केली कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

महामार्गावर वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. परंतु काही बेशिस्त वाहनचालक अतिवेगाने वाहन चालवितात. अशा वाहनचालकांना आरटीओच्या वायुवेग पथकाने दणका दिला असून, राष्ट्रीय आणि राज्य महामार्गावरील १४ हजारांपेक्षा बेशिस्त वाहनचालकांवर आरटीओच्या वायुवेग पथकाने कारवाई केली आहे.



महामार्गावर वाहन चालविताना अपघात होऊ नये, यासाठी प्रत्येक गाडी ठरविलेल्या वेगाने आणि नियमानुसार चालविणे आवश्यक आहे. तसेच वळण मार्ग, घाट मार्गात गाडीचा वेग कमी ठेवणे गरजेचे असते. परंतु अशा ठिकाणी काही वाहनचालकांकडून ओव्हर स्पीडने (अतिवेग) गाडी चालविण्यात येते. अशा वाहनचालकांवर आरटीओच्या वायुवेग पथकाकडून कारवाई करण्यात येते.

याशिवाय ओव्हरलोड (अवजड), लेन कटिंग, ड्रंक अँड ड्राइव्ह, मोबाइल टॉकिंग, सीटबेल्ट, फॅन्सी नंबरप्लेट, अनधिकृत पार्किंग, नो-एन्ट्री, थकीत कर, योग्यता प्रमाणपत्र नाही (फिटनेस तपासणी) यांसह विविध कारणांमुळे पुणे आरटीओकडील वायुवेग पथकाकडून (मोटार वाहन निरीक्षक) कारवाई करण्यात येते. सन २०२३ पेक्षा गेल्या यामध्ये वाढ झाली असून, वाहनचालकांनी नियम पाळून वाहन चालवावी, असे आवाहन आरटीओकडून करण्यात आले आहे.

राज्य महामार्गावरील कारवाई - ६,४३७

राष्ट्रीय महामार्गावरील कारवाई - ७,५९१

**एकूण कारवाई - १४, ०५८**

“ महामार्गावरील वाढते अपघात कमी करण्यासाठी मोटार वाहन कायद्यांतर्गत वायुवेग पथकांमार्फत कारवाई केली जाते. राज्य तसेच राष्ट्रीय महामार्गावर गेल्या वर्षी १४ हजारांपेक्षा अधिक बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहन चालविताना वेगावर मर्यादा ठेवणे आवश्यक आहे.

**- स्वप्निल भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.**

# इंद्रायणी थडी होणारच.. पण, प्रतीक्षा आणखी काही दिवसांची

## शिवांजली सखी मंच व संयोजकांची माहिती; इंद्रायणी थडी आणखी काही दिवस लांबणीवर

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे नेते तथा भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून शिवांजली सखी मंचच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणारा आणि महाराष्ट्रभरातील महिला भगिनींसाठी आकर्षणाचाच केंद्रबिंदू असणारा इंद्रायणी थडी महोत्सव या वर्षीही २७ फेब्रुवारी ते २ मार्च या चार दिवसांदरम्यान आयोजित करण्यात आला होता. पण, काही कारणांमुळे इंद्रायणी थडी महोत्सवाची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. याबाबत आयोजकांकडून अधिकृत पत्रकाद्वारे माहिती देण्यात आली आहे.



अवघ्या महाराष्ट्रातील माता-भगिनींच्या उद्योजकता विकासासाठी हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या इंद्रायणी थडी महोत्सवाची वर्षभर आपुलकीने प्रतिक्षा असते. यावर्षी विधानसभा निवडणूक आचारसंहिता, निवडणूक निकाल आणि त्यांनरच्या काळातील राजकीय-सामाजिक घडामोडी यामुळे इंद्रायणी थडीचे आयोजन करण्यास विलंब झाला, त्यातच २७ फेब्रुवारी ते २ मार्च या चार दिवसांदरम्यान आयोजित व जाहीर करण्यात आलेला हा महोत्सव आणखी काही दिवस लांबणीवर पडणार आहे.

आयोजक आमदार महेश लांडगे व शिवांजली सखी मंच च्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकाद्वारे सांगितले आहे की, इंद्रायणी थडीची तयारी शिवांजली संखी मंच आणि सर्वच सहकाऱ्यांनी मोठ्या उत्साहात सुरू केली होती. स्टॉल वाटप, विविध कार्यक्रमाची रुपरेषा अगदी अंतिम टप्प्यात होती. पण, सध्या इयत्ता १२ वीच्या परीक्षा सुरू आहेत. ज्या ठिकाणी इंद्रायणी थडी भरवण्यात येत आहे. या परिसरात 20 ते 25 मोठ्या शाळा आहेत. या ठिकाणी परिक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थांना व

> देव-देश अन् धर्म आणि शेती-माती-संस्कृतीचा पुरस्कार आणि स्त्रीशक्तीचा सन्मान या संकल्पनेतून होणारा इंद्रायणी थडी महोत्सव काही दिवस पुढे ढकलण्यात येत आहे. महिला बचत गट आणि विविध उपक्रम, कार्यक्रम यांचे संयोजक यांनी नोंदणी केलेले स्टॉल व कार्यक्रम याचे नियोजन 'जैसे थे' राहील. नवीन वेळाप्रत्रक निश्चित झाल्यानंतर सर्वानाच याबाबत पूर्वसूचना दिली जाईल. आपण सर्वजण मिळून निश्चितपणे इंद्रायणी थडी अगदी थाटात साजरी करण्यात येणार आहे.
>
> **- मुक्ता गोसावी, समन्वयक, इंद्रायणी थडी महोत्सव.**

पालकांची गैरसोय होणार आहे. वाहतूक नियोजन आणि नियंत्रण हा मुद्दाही महत्त्वाचा आहे. याबाबत शिक्षण संस्था प्रशासनाकडून तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली. राज्य सरकारने 'कॉपीमुक्त महाराष्ट्र' अभियान सुरू केले आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन आणि शिक्षण विभागाला अडचण होणार नाही, याची काळजी घेणे क्रमप्राप्त आहे.

तसेच, मोशी आणि चऱ्होली गावातील ग्रामदैवतांचा उत्सव होणार आहे. त्यामुळे ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांनी एकाच आठवड्यात तीन जत्रा होतील. त्यामुळे स्थानिक नागरिकांना सहभागी होता येणार नाही, असाही एक विचार पुढे आला. दरम्यान, श्रीक्षेत्र अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिराचे मुख्य पुजारी आचार्य सत्येंद्र दास आणि प्रखर हिंदूत्ववादी कीर्तनकार ह.भ.प. शिरीष महाराज मोरे यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यामुळे अध्यात्मिक आणि वारकरी सांप्रदायातून शोक व्यक्त होत आहे. अशावेळी या महोत्सवाचे आयोजन योग्य ठरणार नाही.

# मावळात बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत प्रवास

## आमदार सुनील शेळके यांच्या पुढाकाराने 46 गावांमधील 2500 विद्यार्थ्यांना सुविधा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर वेळेत आणि विनासायास पोहोचता यावे, यासाठी आमदार सुनील शेळके यांच्या पुढाकाराने 'मावळ डेव्हलपमेंट फाउंडेशन'च्या वतीने मोफत वाहतूक सेवा सुरू करण्यात आली आहे. हा उपक्रम सन २०१६-१७ पासून सुरू असून यंदा नवव्या वर्षात पदार्पण करत आहे. यंदाच्या परीक्षेसाठी २,५०० हून अधिक विद्यार्थ्यांना या सेवेचा लाभ मिळणार आहे.

मावळ तालुक्यातील आंदर मावळ, पवन मावळ आणि नाणे मावळ या भागातील तळेगाव दाभाडे, लोणावळा, पवनानगर, कामशेत, वडगाव, कान्हे, कार्ला, शिवणे, उर्से, थोरण, डोणे, जांबवली, कांब्रे, चिखलसे, निगडे, आंबळे, खांडी आदी ४६ गावांमधील विद्यार्थ्यांसाठी परीक्षा केंद्रावर जाण्या-येण्यासाठी मोफत प्रवास व्यवस्था करण्यात आली आहे.



### पाच परीक्षा केंद्रांवर ४,५८२ विद्यार्थी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला मावळ तालुक्यातील पाच परीक्षा केंद्रांवर एकूण ४,५८२ विद्यार्थी बसणार आहेत. या विद्यार्थ्यांसाठी मोफत वाहतूक सेवा उपयुक्त ठरणार आहे.

### विद्यार्थ्यांसाठी मोलाची सोय

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर वेळेत पोहोचता येईल आणि परीक्षा संपल्यानंतर घरी परतणे सोयीचे होईल. गेल्या नऊ वर्षांपासून चालू असलेल्या या सेवेमुळे पालक आणि विद्यार्थी समाधान व्यक्त करत आहेत. या उपक्रमामुळे तालुक्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मोठी मदत मिळत आहे. मागील वर्षीप्रमाणे यंदाही या सुविधेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. विद्यार्थ्यांसाठी ही मोफत सेवा उपयुक्त ठरणार असून, या उपक्रमामुळे परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना मानसिक शांती मिळेल आणि परीक्षेवर अधिक लक्ष केंद्रित करता येईल.

### प्रवास सुविधेची गरज का?

» मावळ तालुक्यातील अनेक विद्यार्थी दुर्गम भागांतून येतात. परीक्षेच्या काळात महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या (एसटी) बससेवा मर्यादित असल्याने तसेच अवैध प्रवासी वाहतुकीच्या समस्येमुळे विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रांवर पोहोचणे कठीण होते. ही गरज लक्षात घेऊन आमदार सुनील शेळके यांनी पुढाकार घेतला आणि 'घर ते परीक्षा केंद्र' मोफत प्रवास सेवा सुरू केली.

### परीक्षा केंद्रे आणि त्यातील विद्यार्थीसंख्या पुढीलप्रमाणे

- » इंद्रायणी कॉलेज, तळेगाव दाभाडे – २,०९५ विद्यार्थी
- » डी. पी. मेहता कनिष्ठ महाविद्यालय, लोणावळा – १,४५० विद्यार्थी
- » पवना ज्युनिअर कॉलेज, पवनानगर – ३७० विद्यार्थी
- » पंडित नेहरू माध्यमिक विद्यालय, कामशेत – ४८५ विद्यार्थी
- » शिवाजी विद्यालय, देहूरोड – ३३८ विद्यार्थी

> विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवण्यासाठी शिक्षणासोबतच त्यांना आवश्यक सुविधा मिळणे गरजेचे आहे. ही मोफत वाहतूक सेवा विद्यार्थ्यांच्या हितासाठी सुरू केली असून, भविष्यातही ती सुरू राहील.
>
> **- सुनील शेळके, आमदार, मावळ.**

# शिवाजीनगर स्थानकाच्या पुनर्बांधणीचा मार्ग मोकळा

## 600 कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचे भूमिपूजन मे महिन्यात होणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) आणि महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (महामेट्रो) यांच्यातील वादामुळे रखडलेला शिवाजीनगर येथील जुन्या एसटी बसस्थानकाच्या पुनर्बांधणीचा प्रकल्प आता मार्गी लागणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत दोन्ही विभागांमध्ये समेट घडवून आणण्यात आला असून, या प्रकल्पासाठी ‘एमएसआरटीसी’ आणि महामेट्रो यांच्यात येत्या आठवडाभरात करार करण्यात येणार आहे. ६०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचे भूमिपूजन मे महिन्यात होणार असून, तीन वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.



शिवाजीनगर येथील एसटी बसस्थानकाच्या पुनर्बांधणीबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बुधवारी आढावा बैठक पार पडली. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार सिद्धार्थ शिरोळे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, दूरदृश्य प्रणालीद्वारे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, परिवहन विभागाचे सहसचिव राजेंद्र होळकर, नगरविकास विभागाचे सहसचिव विजय चौधरी उपस्थित होते.

शिवाजीनगर येथील जुन्या बसस्थानकाची जागा महामेट्रोने पुनर्बांधणीसाठी ताब्यात घेतली आहे. महामेट्रोकडून बसस्थानकाच्या सुविधांबाबत आराखडादेखील तयार करण्यात आला आहे. मात्र, प्रवाशांच्या सुविधा, अत्याधुनिक पद्धतीचे बसस्थानक, वातानुकूलित प्रतीक्षा कक्ष आणि इतर सुविधा देण्याची मागणी महामंडळाकडून करण्यात आली. त्यावरून दोन्ही विभागांमध्ये वाद निर्माण झाला होता. त्यामुळे या प्रकल्पाचे काम रखडले होते. हा प्रकल्प महत्त्वाचा असून, विकसकाशी ९९ वर्षांचा करार करावा लागणार आहे. त्यासाठी संबंधित प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्याचा आदेश उपमुख्यमंत्री पवार यांनी दिला.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

अत्याधुनिक बसस्थानकासोबतच व्यावसायिक संकुलाची उभारणी

वाहनतळासाठी दोन तळघरे

किरकोळ विक्रीसाठी ‘सेमी बेसमेंट’

बसआगार पहिल्या मजल्यावर आणि बसवाहनतळ दुसऱ्या मजल्यावर

शासकीय व खासगी कार्यालयांसाठी १६ मजली इमारत

### ‘पीपीपी’ तत्त्वावर प्रकल्प

» महामेट्रोकडून सार्वजनिक, खासगी, भागीदारी (पीपीपी) तत्त्वानुसार हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. ६०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया राबवून मे महिन्यापर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. तीन वर्षांत हा प्रकल्प पूर्ण केला जाणार आहे. शिवाजीनगर बसस्थानक मूळ जागी येण्यासाठी तीन वर्षे वाट पाहावी लागणार आहे.


> नागरिकांच्या मागणीनुसार गेल्या अनेक दिवसांपासून शिवाजीनगर बसस्थानकाच्या मूळ जागेबाबत पाठपुरावा करण्यात येत होता. त्या दृष्टीने उपमुख्यमंत्री पवार यांनी घेतलेल्या बैठकीत अत्याधुनिक सुविधांयुक्त बसस्थानक उभारण्याचा आदेश देण्यात आला आहे. मे महिन्यात बसस्थानकाच्या प्रत्यक्ष कामाचे भूमिपूजन होईल. पुढील तीन वर्षांत बांधकाम पूर्ण होईल.
>
> **- सिद्धार्थ शिरोळे, आमदार.**

# ‘ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट’मध्ये उंदीर, ढेकणांचा सुळसुळाट

## विद्यापीठातील मुलांच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्याला चार वेळा उंदराचा चावा

**पुणे | प्रतिनिधी**

‘ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट’ असा लौकिक असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात उंदरांचा सुळसुळाट झाल्याची तक्रार विद्यार्थ्यांकडून करण्यात आली आहे. उंदरांनी चावा घेण्यासह चादरीही कुरतडल्या असून, उंदरांशिवाय ढेकणांचाही त्रास असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, या प्रकाराची दखल घेऊन उपाययोजना केल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले.



विद्यापीठातील मुलांच्या वसतिगृह जी-६ मधील २२ क्रमांकाच्या खोलीत राहणाऱ्या महेश जाधव या विद्यार्थ्याला चार वेळा उंदराचा चावा सहन करावा लागला आहे. उंदराच्या चाव्यामुळे महेशला दोन दिवसांसाठी औंध जिल्हा रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्याची वेळ आली होती. हाताला, पायाला उंदराच्या चाव्यामुळे गंभीर जखमा झाल्या असून, रेबीजची लक्षणे जाणवत आहेत. खाण्याचे पदार्थ, शैक्षणिक साहित्य, इतकेच काय तर अंगावरची चादरही उंदराने कुरतडल्याचे महेशने सांगितले. शैक्षणिक साहित्यासोबतच पिशव्या, कपडेही उंदरांनी कुरतडले आहेत. ही बाब विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आणून देऊनही गांभीर्याने उपाययोजना केल्या जात नसल्याचे राजेंद्र भोसले या विद्यार्थ्याचे म्हणणे आहे.

वसतिगृहात उंदरांशिवाय ढेकणांचाही त्रास आहेच. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता ठेवली जात नाही. वसतिगृहाच्या खानावळीत चांगले जेवण मिळत नाही. त्यात कधी झुरळ, तर कधी अळी सापडण्याच्या घटना घडतात. त्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत, असे विद्यार्थ्यांनी सांगितले. विद्यापीठाच्या वसतिगृहात उंदीर, ढेकणांचा त्रास होत असताना आता मुख्य इमारतीमधील कुलगुरू कार्यालयात वास्तव्यास जायचे का, असा प्रश्नही विद्यार्थ्यांनी उपस्थित केला.

> उंदरांच्या उपद्रवाबाबतची तक्रार नोव्हेंबरमध्ये दाखल झाली होती. त्याची दखल घेऊन तातडीने पेस्ट कंट्रोल करण्यात आले. उंदरांचे मार्ग बंद करण्यात आले. काही विद्यार्थ्यांना खोल्याही बदलून देण्यात आल्या आहेत.
>
> **- डॉ. ज्योती भाकरे, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.**